वर्ष-०९ | अंक-१६ | मुंबई, मंगळवार ०७ ते १३ मार्च - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 गर्भनिरोधक गोळ्यांचा वापर आणि त्यांचे परिणाम

3 → आरोग्याचे डोही : मरणारी औषधे!

ट्युशन क्लासला जाणाऱ्या विद्यार्थिनीला लुटले, गोरेगाव पोलिसांनी 24 तासात आरोपींना ठोकल्या बेड्या ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## मुंबईतून दोन वर्षाच्या मुलाचे अपहरण, आरपीएफच्या पथकाने लखनौमधून केली सुटका



लखनौ : रेल्वे सुरक्षा दल आणि मुंबई पोलिसांच्या संयुक्त कामगिरीतून मुंबईतील पालकाला दोन वर्षा चा चिमुरडा परत मिळाला आहे. मुंबईतून दोन वर्षांच्या मुलाचे अपहरण केल्यानंतर आरोपी पती-पत्नी सोमवारी रेल्वेने लखनौला पोहोचले. याची माहिती रेल्वे संरक्षण दलाला आधीच मिळाली होती. ट्रेन ऐशबाग स्थानकावर पोहोचताच आरपीएफच्या पथकाने दोघांनाही अटक केली. यानंतर दोघांना बाजारखाला पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. यानंतर विमानातून आलेल्या मुंबई पोलिसांनी त्या निरपराधांना अपहरणकर्त्यांसह सोबत घेतले. मिळालेल्या माहितीनुसार, ऐशबाग येथील आरपीएफ चौकीचे प्रभारी एबी जडेजा यांना सोमवारी महाराष्ट्र पोलीस ...पान २ वर...




## होळीला गालबोट! नाशिकमध्ये भरवस्तीत 28 वर्षीय तरुणाला संपवलं, दोन तासांत संशयिताना अटक






एकीकडे होळीच्या (Holi) सणाच्या जल्लोष सुरु असताना नाशिक शहरात (Nashik City) भरवस्तीत तरुणाला संपवल्याची घटना घडली आहे. शहरातील दिंडोरी नाका परिसरात ही घटना घडली असून त्यानंतर अवघ्या काही तासात पोलिसांनी संशयितांना अटक केली. मात्र गुन्हेगारीचा फास नाशिक शहराला आवळत असल्याचे वारंवार अधोरेखित होत आहे. नाशिक (Nashik) शहरात दिवसाआड खुनाची (Murder) घटना घडत असून गुन्हेगारी शेवटच्या टोकावर गेली असल्याचे हे चित्र ...पान २ वर...

## 55 लाख रुपये किंमतीचा 275 ग्रम वजनाचा मफेड्रान (MD) अंमली पदार्थ बाळगणा-या आरोपीतांवर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.



मिरा भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रा होळी व धुलिवंदन सणाचे अनुषंगाने अंमली पदार्थ खरेदी विक्री करणा-या ईमांविरुध्द कारवाई करण्याबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते. मिळालेल्या सुचना व मार्गदर्शनप्रमाणे दिनांक 03/03/२०२३ रोजी सायं. १८.00 वाजेच्या सुमारास अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि.श्री. अमर मराठे यांचे नेतृत्वाखाली अधिकारी व अंमलदार हे मिरारोड, नवघर, भाईंदर परिसरात गस्त करीत असताना मंबईकडे जाणा-या वाहीनीवर, फाउंटन हाटेलच्या समोरील रोडवर, घोडबंदर, काशिमीरा या ठिकाणी दोन ईसम संशयास्पद स्थितीत आढळल्याने दोन पंचासमक्ष छापा कारवाई करुन त्यांना ताब्यात घेतले. त्यांना नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्याचे नाव १) सुलतान अब्दुल कादर कारेंगल असे सांगितले. त्याचे अंगझडती दरम्यान त्याच्या कब्जात १४५ ग्रम व २) बाहुद्दीन निजामुद्दीन कादरी, दोन्ही राहणार मुंब्रा ठाणे याचे अंगझडती दरम्यान त्याच्या कब्जात ४0 ग्रम वजनाचा असा एकुण २७५ ग्रम वजनाचा मेफेड्रान हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असल्याचे निदर्शनास आले. नमुद अरोपीतांविरुध्द एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२ (क), २९ अन्वये काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा नोंद क्र. II १६0/२०२३ प्रमाणे दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी कक्ष करत आहे. सदरची कारवाई अविनाश sigh, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि. श्री. अमर मराठे, स.पो.नि.विलास कुटे, पो.हवा. टक्के, आव्हाड, इगंळे, प पाटील, सपकाळ, घरबुडे, पो. अंम. यादव यांनी केली आहे.

## नव्याने मान्यताप्राप्त यादीत समावेश होण्याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेवू !

**महासंचालक भोज यांचे 'जर्नालिस्ट असोसिएशन' ला आश्वासन**

मुंबई, दि.५ (प्रतिनिधी): महाराष्ट्र सरकारच्या कामांना वृत्तपत्रे कायमच प्राधान्याने प्रसिध्दी देत असतात. या वृत्तपत्रांचा सरकारी जाहिराती हा प्राणवायू आहे. त्यामुळे आजच्या चॅट जीपीटीच्या जगातही वृत्तपत्रे विश्वासार्हता टिकवून आहेत. यातील नव्या वृत्तपत्रांनी मान्यताप्राप्त यादीत समावेश होण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाकडे अर्ज केलेले आहेत. यातील निकष पूर्ण करणाऱ्या वृत्तपत्रांचा लवकरच यादीत समावेश केला जाईल, असे आश्वासन विभागाच्या महासंचालक जयश्री भोज यांनी दिले. 'जर्नालिस्ट असोसिएशन' या पत्रकारांच्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच महासंचालक भोज यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी निवेदन दिले. या निवेदनात त्यांनी नव्याने मान्यताप्राप्त यादीत समावेश होण्यासाठी विलंब होत असल्याचे नमूद केले होते. यावर भोज यांनी त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत. भोज यांच्या आश्वासनामुळे शेकडो वृत्तपत्राच्या मालकांना दिलासा मिळालेला आहे. 'जर्नालिस्ट असोसिएशन'च्या अध्यक्षा अधिवक्ता स्मिता चिपळूणकर, कोषाध्यक्ष व 'स्प्राऊट्स' या इंग्रजी वृत्तपत्राचे संपादक उन्मेष गुजराथी, ज्येष्ठ पत्रकार सलीम शेख, भीमराव धुळप, हेमंत रणपिसे, श्रीनिवासन चारी यांसह संस्थेचे पदाधिकारी व वृत्तपत्रांचे मालक उपस्थित होते. काय आहे मागणी?माहिती व जनसंपर्क विभागाच्या ...पान २ वर...

## बारावी गणिताचा पेपर फूटप्रकरणी आता एसआयटीमार्फत तपास होणार



बुलडाणा: या आधीच इंग्रजी विषयांमध्ये प्रश्न आयोजित उत्तर छापून दिल्याने शिक्षण विभागाला सहा गुण विद्यार्थ्यांना द्यावे लागत असताना. त्या पाठोपाठ आता बारावी च्या गणित सारख्या महत्त्वाच्या विषयाची फेर परीक्षा घेण्या करता शिक्षण मंडळाला विचार करावा लागतो का याकडे सर्व लक्ष लागले आहे. एकंदरी आता हा तपास एसआयटी मार्फत होणार असल्याने या पेपर फुट प्रकरणाचे मुख्य सूत्रधार पर्यंत कशा पद्धतीने आणि तेही कमी वेळामध्ये पोहोचल्या जाते हा सुद्धा एक त्यांच्यासमोरचा मोठा प्रश्न असेल. जे आरोपी आतापर्यंत ताब्यात घेतले आहे त्यामध्ये काही खाजगी शिक्षण संस्थातील ...पान २ वर...

## परदेशात नोकरी देण्याच्या आमिषाने महिलांची फसवणूक, काशिमीरा पोलिसांकडून दोघांना बेड्या




परदेशात नोकरी मिळवून देण्याच्या आमिषाने महिलांची फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना एका एनजीओच्या मदतीने काशिमीरा पोलीसांनी (Kashmiri police) अटक केली आहे. अशरफ मैदु कैवारी आणि नमीता सुनिल मालुसरे अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. ही टोळी ओमान-मस्कत देशात घरकामाच्या नोकरीचे दरमहा 30,000 रुपये पगाराचे आमिष देवून तेथे महिलांची विक्री करायचे असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काशिमीरा पोलिसांनी अटक केलेले हे दोघे आरोपी भारतीय महिलांना ओमान-मस्कत देशात घरकामाच्या नोकरीचं अमिष दाखवून त्यांचा सौदा करायचे. घरकामाचे महिना तीस हजार रुपये मिळतील असे सांगायचे. नोकरीच्या निमित्ताने हे संशयीत पीडित महिलांना ओमान देशात तीन लाख रुपयांना विकायचे. ज्यांनी या महिलांना विकत घेतलं आहे ते जे काही काम सांगतील ...पान २ वर...

## मुलांचे अपहरण करून विकणारी टोळी गजाआड, एका मुलाची किंमत पाच लाख




परभणी पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर मुलांचे अपहरण करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा पर्दा फाश झाला आहे. लहान मुलांना वेगवेगळी आमिषे दाखवून ही टोळी पळवून नेत होते. त्यानंतर मोठ्या रक्कमेत अपहरण केलेल्या मुलांना इतर राज्यात विकण्याचे काम त्यांच्याकडून केले जायचे. तर या प्रकरणी एकूण 11 जणांच्या आतंरराज्य टोळीला परभणी पोलिसांनी अटक केली. तसेच या टोळीच्या ताब्यात असलेल्या एका तेरा वर्षीय अल्पवयीन मुलाची सुटका देखील पोलिसांनी केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, केवळ पैशांसाठी जवळच्या नातेवाईकांच्या मुलांना आमिष दाखवून अपहरण ...पान २ वर...

## लिंग परिवर्तन केलेल्या तरुणीने राहत्या घरात केली आत्महत्या, हे होते कारण...




मुंबई: गोरेगाव येथे राहणाऱ्या जोएना नावाच्या एका ३७ वर्षांच्या तरुणीने आपल्या राहत्या घरी आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे. मुलाने लिंग परिवर्तन करुन मुलगी बनली होती. तिला कोणीही मुलगी मानत नव्हते, तिच्यासोबत मुलगी असल्याप्रमाणे वागत नव्हते. त्यातून आलेल्या मानसिक नैराश्यातून तिने जीवन संपविल्याचे तपासात उघडकीस आले आहे. सुसाईट नोट सापडली: घटनास्थळाहून पोलिसांना एक सुसाईट नोट सापडली आहे. त्यात तिने तिची ही खंत व्यक्त केली आहे. दरम्यान तिच्या मित्राचा जबाब नोंदवून गोरेगाव पोलीसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे. ...पान २ वर...




## मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांबाबत आक्षेपार्ह ट्वीट, मुंबईतील तरुणाविरोधात नागपुरात गुन्हा



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप नेते चंद्रकांत पाटील यांच्याविरोधात आक्षेपार्ह ट्वीट करणाऱ्या मुंबईतील तरुणाविरोधात नागपुरातील लकडगंज पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आयपीसीच्या कलम 354, 500, 504, 505, 507 आणि आयटी ॲक्टच्या कलम 67 अन्वये या तरुणाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सार्थक कपाडी असं या तरुणाचं नाव आहे. तो ठाकरे गटाचा कार्यकर्ता असल्याची प्राथमिक माहिती आहे.हे ट्वीट 19 फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहेत. सार्थक कपाडी या तरुणाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजप ...पान २ वर...



# सिंचनासाठी क्षारयुक्त पाणी वापरताना...

**शेतकरी मित्रांनो, गेल्या काही वर्षांमध्ये शेतीसाठी क्षारयुक्त पाण्याच्या अतिरिक्त वापरामुळे क्षारपड जमिनींचे प्रमाण वाढत आहे. त्याचे प्रमाण सर्वदूर पसरलेले असले तरी मुख्यत्वे उसाचे क्षेत्र आणि काळ्या जमिनीत ही समस्या जास्त प्रमाणात आढळून येते. क्षारयुक्त पाणी ठिबक सिंचनाद्वारे वापरल्यास ठिबक सिंचनाची विविध उपकरणे क्षार साठून खराब होतात किंवा त्यांच्या कार्यक्षमतेत घट होते. अशा स्थितीमध्ये एकूणच पाण्याचे व्यवस्थापन योग्य प्रकारे करणे अत्यावश्यक बनत चालले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाने क्षारयुक्त पाण्याचा सिंचनासाठी वापर करताना काय काळजी घ्यावी, याविषयी दिलेली माहिती जाणून घेऊया...**

साधारणतः क्लोरिन, बायकार्बोनेट, कॅल्शिअम, मॅग्नेशियम, सोडियम, बोरॉन,लिथियमसारखे क्षार पाण्यात मिसळले जातात. निचऱ्याचा अभाव, पाण्याचा बाष्पीभवनाचा वेग, रासायनिक खते व कीडनाशके यांचा वाढता वापर अशा अनेक कारणांमुळे पाणी क्षारयुक्त होते.

**ओलितासाठी पाण्याची प्रत-**

पाण्याची प्रत आणि जमिनीचा पोत या दोन्हीचा संयुक्तपणे विचार करूनच ओलितासाठी पाण्याची योग्यता ठरवली जाते. पाण्यातील क्षार, सोडियम व बोरॉनचे प्रमाण यावरून पाण्याची प्रत ठरवली जाते. क्षारांचे प्रमाण ०.२५ डेसी सायमन प्रतिलीटरपेक्षा कमी असेल, पाण्यातील मॅग्नेशियम, कॅल्शियम यांचे गुणोत्तर प्रमाण एकपेक्षा कमी असेल, याशिवाय बोरॉन २ मिलिग्रॅम प्रतिलीटर पेक्षा कमी असल्यास पाण्याची प्रत ओलितासाठी चांगली असते.

**क्षारयुक्त पाण्याचा वापर करताना कोणती काळजी घ्याल?**

जमिनीला साधारण उतार द्यावा. उताराच्या दिशेने खोल नांगरट करावी. शेतात उताराच्या दिशेने योग्य मशागत करावी. पिकांची लागवड वरंब्याच्या बगलेत करावी. पिकांमध्ये नियमित, वेळोवेळी उताराच्या दिशेने आंतरमशागत करावी. सेंद्रिय खतांचा तसेच हिरवळीच्या खतांचा जास्त प्रमाणात वापर करावा. रासायनिक खतांमध्ये नत्रयुक्त खतांचा शिफारशीपेक्षा २५ टक्केजास्त वापर करावा. सरीमध्ये पाचटाचे आच्छादन करावे. पिकांना वारंवार परंतु मर्यादित पाणी शक्यतो स्प्रिंक्लरद्वारे द्यावे. पाटाचे पाणी उपलब्ध असल्यास खारवट पाण्यात ते ठरावीक प्रमाणात मिसळून द्यावे.

एक आड एक सरी भिजवावी. ठिबक संचाचा वापर पाण्यामध्ये विद्राव्य क्षारांची मात्रा ३.१२ डेसी सायमन प्रतिमीटरपेक्षा कमी असल्यास करावा. गहू, ज्वारी, ऊस, मका, सूर्यफुल, कापूस, सातू, शुगरबीट, पालक, लसूण घास यासारख्या क्षार सहनशील पिकांची निवड करावी. पाणी जास्त क्षारयुक्त, असेल तर निलगिरी, बांबू, सुबाभूळ इत्यादी वृक्षांची लागवड करावी.

# डाळिंबाचे पाणी व्यवस्थापन

**डाळिंबाला उथळ पाणी देऊ नये, त्याला खोलवर ओलावा गरजेचा असतो. परंतु ९५ टक्के वाफसा व ५ टक्के ओलावा असावा. म्हणजेच कमीत कमीवेळेत जास्त पर्क्युलेशन करण्याची व्यवस्था असावी. डाळींब पिकात ६ किंवा ८ लीटर / ताशीचे ड्रीपर वापरावे. इनलाइन ड्रीपरऐवजी ओनलाइन ड्रीपर जास्त उपयुक्त ठरतात.**



डाळींब पिकाला हलक्या जमिनीत २.५ तास आठवड्यातून दोन किंवा तीनवेळेस व भारी जमिनीत २ तास आठवड्यातून.जास्तीत जास्त दोन वेळेस पाणी द्यावे. ज्यावेळी पाणी कमी करा असे सुचविले जाते, तेव्हा पाण्याचे तास कमी न करता दोन पाळ्यांमधील दिवस वाढवणे अपेक्षित असते.

पाण्याचे काही लीटर कमी केल्यास पिकावर ताण निर्माण होऊ शकतो. दिवसांचा अंतर वाढविल्याने झाड संतुलन करण्यास प्रवृत्त होते व अधिक कणखर बनते.

डाळींब हे दुष्काळी व कोरड्या हवामानातील पीक असल्याने त्याच्यात पाणी धरून ठेवण्याची क्षमता असते. फक्त त्यासाठी जमिनीत ह्युमसचे प्रमाण टिकून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. सोबत विविध कडब्यांची (बाजरी, मका, ज्वारी) कुट्टी ड्रीपरवर मल्चिंग करून टाकणे अत्यंत फायदेशीर ठरत आहे. या वर्षीच्या वातावरणात सर्व काही औषधे वापरूनही रोग वाढल्याचे २-३ टक्के बागांमध्ये लक्षात आल्यानंतर तीन प्रमुख कारणे समोर आली. त्यामध्ये

रासायनिकफवारण्यांचा अतिरिक्त व अनावश्यक वापर. बेसल डोस पिकाच्या आवश्यकतेपेक्षा कमी भरणे. पाण्याचा अति वापर किंवा अतिताण.

पाण्याचा अतिवापराने म्हणजे रोज किंवा दिवसाआड पाणी देणे, ३-४ तास पाणी देणे, फ्लोचे पाणी सोडणे होय.


मुळीचे क्षेत्र सतत ओले ठेवणे म्हणजे मर, नेमॅटोड, तेल्या डाग यांना आमंत्रणच होय. पाण्याचे नियोजन करताना आपण पाण्याचा पीएच, टीडीएस व ईसी तपासला तर असे लक्षात येईल की, ते पाणी पिकाला जास्त देणे म्हणजे विष दिल्यासारखे आहे.

पाण्याचा पीएच हा साडेसहा ते साडेसात, टीडीएस ३००-४०० असायला हवा परंतू तो यापेक्षा जास्त आढळून आल्याने पिकावर पाण्यातील जास्तीच्या पीएच व टीडीएसचे विषाक्त परिणाम होतात. चला, पाणीच तर आहे, कितीही दिले तर त्याला काय होतेय असे म्हणून चालणार नाही.

मित्रहो, आपण क्षारयुक्त पाणी पिकांना देत आहोत, आजकाल आपण घरात आरओ मशीनमधून फिल्टर करून पाणी घेतोय कारण ते थेट पिण्यायोग्य राहिलेले नाही. मग ते पिकांना तसेच सुरक्षित कसे असू शकते. ४-५ वर्षांपूर्वी मातीत ऑरगॅनिक कार्बन होता, जो पाणी फिल्टर करून पिकाला उपलब्ध करून देत होता. आज कार्बन नसल्यात जमा आहे. त्यामुळे ते क्षारयुक्त जसेच्या तसे पिकात उचलले जाते व पिकावर दुष्परिणाम करते. आपण जर वॉटर सोल्यूबल खते सोडत असाल तर आपल्या ड्रीपरजवळ पांढरे थर तयार होतात. ज्यामुळे ड्रीपरचा डिस्चार्ज कमी होतो किंवा ते बंदही पडतात.

# फ्रेंच बीन शेती

**निरोगी राहण्यासाठी लोक हिरव्या भाज्या जास्त खातात. त्यामुळे हिरव्या भाज्यांनाही मागणी आहे. अशा परिस्थितीत भाजीपाला पिकवणे फायदेशीर ठरत आहे. अनेक प्रकारच्या भाज्यांनी बनवलेल्या भाज्यांमध्ये फ्रेंच बीन्सला महत्त्वाचे स्थान आहे. फ्रेंच बीन्सची प्रगत पद्धतीने लागवड करून तुम्ही चांगला नफा मिळवू शकता.**



**हवामान-** फ्रेंच बीन हे समान हवामानातील पीक आहे. १८-२० अंश सेंटीग्रेड तापमान त्याच्या चांगल्या वाढीसाठी आणि उत्पादनासाठी योग्य आहे. १६ अंशापेक्षा कमी आणि २२ अंशापेक्षा जास्त तापमान पिकाच्या वाढीवर आणि उत्पादनावर विपरीत परिणाम करते. फ्रेंच बीन पीक हे धूक आणि अति उष्णतेसाठी संवेदनशील आहे.

**जमीन-** जवळपास सर्व प्रकारच्या मातीत शेती केली जाते. वालुकामय चिकणमातीपासून ते चिकणमातीपर्यंत चांगली निचरा असलेली माती योग्य आहे. सामू मूल्य ६ ते ७ च्यादरम्यान असावे. पाणी साचण्याची स्थिती पिकासाठी अत्यंत हानिकारक आहे.

**पूर्वमशागत-** सर्वप्रथम शेतातील इतर पिकांचे अवशेष काढून टाका, शेतात खोल नांगरणी करून काही दिवस मोकळे सोडा. नंतर शेतात जुने शेणखत टाकून ते जमिनीत चांगले मिसळावे. त्यानंतर शेतात नांगरणी करावी. नांगरणीनंतर ३-४ दिवसांनी शेतात रोटाव्हटर चालवून माती मोकळी करावी. नंतर एक पूल ठेवून जमीन सपाट करावी.

**संकरीत वाण-** बीन्सचे अनेक प्रकार आहेत. जे त्यांचे उत्पादन, आदर्श वातावरण आणि वनस्पतींच्या आधारावर विविध प्रजातींमध्ये विभागले गेले आहेत.

**झुडुपवर्गीय जाती -** या प्रकारच्या वनस्पती झुडुपाच्या स्वरूपात वाढतात, जे बहुतेक डोंगराळ भागात वाढतात. जसे की स्वर्ण प्रिया, अर्का संपूर्ण, अर्का समृद्धी, अर्का जय, पंत अनुपमा, पुसा पार्वती, **H.F.B. - २**

**वेल जाती-** बेलदार जातीची झाडे वेलीच्या रूपात वाढतात. ज्यांची शेती बहुतेक मैदानी भागात केली जाते. जसे स्वर्ण लता, अर्का कृष्णा, अर्का प्रश्मी, पुसा हिमलता, सी.एच.पी.बी. - १८२० याशिवाय अनेक प्रकार आहेत. जे त्यांच्या उत्पन्नाच्या आधारावर घेतले जातात. यामध्ये वायसीडी १, प्रीमियर, अर्का सुमन, दीपाली, कंकण भूषण, दसरा आणि फुले गौरी या जातींचा समावेश आहे.

**फ्रेंच बीन बियाण्याचे प्रमाण-** फ्रेंच बीनच्या झुडुपवर्गीय जातींसाठी ७०-८० किलो प्रतिहेक्टरी बियाणे आणि वेलींसाठी ४०-५० किलो प्रतिहेक्टरी बियाणे लागते.

**पेरणी-** लागवड हाताने आणि ड्रिलने केली जाते. ड्रिलद्वारे लावणी केल्यास जास्त उत्पादन मिळते. शेतात लागवड करण्यापूर्वी बियाण्याची प्रक्रिया करावी. त्यानंतर कार्बेन्डाझिम, थायरम किंवा गोमूत्र वापरावे. एक हेक्टरमध्ये बियाणे लागवडीसाठी ८०-१०० किलो बियाणे पुरेसे आहे. बियाणे लागवड सपाट आहे. लागवड करताना प्रत्येक ओळीत एक ते दीड फूट अंतर ठेवावे. ओळीत बियाणे पेरताना एकमेकांपासून १०-१५ सेंटिमीटर अंतरावर ठेवावे. पावसावर आधारित शेतीसाठी बियाणे शेतातच कडे करून वाढवावे.

**सिंचन-** हे पीक जमिनीतील ओलाव्यास अत्यंत संवेदनशील असते. शेतात पुरेसा ओलावा असावा, अन्यथा झाडे सुकतात. ज्याचा उत्पादनावर वाईट परिणाम होतो. त्यामुळे जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन ठरावीक अंतराने पाणी द्यावे.

**तण नियंत्रण-** रासायनिक व नैसर्गिक पद्धतीने तणनियंत्रण केले जाते. पेंडीमेथालिनची योग्य प्रमाणात रासायनिक फवारणी बियाणे लावल्यानंतर करावी. तण नियंत्रणासाठी झाडांची तण काढणे हे नैसर्गिक पद्धतीने केले जाते. यासाठी बिया पेरल्यानंतर साधारण २० दिवसांनी झाडांच्या सुरवातीला पहिली खुरपणी हलकी करावी. शेतीसाठी दोन खुरपण्या पुरेशा आहेत. पहिली खुरपणी झाल्यानंतर साधारण १५-२० दिवसांनी दुसरी खुरपणी करावी.

**फ्रेंच बीन कापणी-** बीन्स पिकण्याआधी उपटून घ्यावे. त्याची रोपे बियाणे लावल्यानंतर सुमारे ५०-६० दिवसांनी उत्पन्न मिळू लागतात.

## मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांबाबत आक्षेपार्ह

नेते चंद्रकांत पाटील, भाजप नेते अतुल भातकळकर, आमदार कृष्णा खोपडे यांच्यासह केंद्रीय मंत्री नारायण राणे या सर्वांच्या विरोधात एकानंतर एक आक्षेपार्ह ट्वीट केले होते. नागपुरातील काही भाजप कार्यकर्त्यांनी ते ट्वीट पाहिले आणि त्यानंतर रात्री उशिरा लकडगंज पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागपूर पूर्व चेआमदार कृष्णा खोपडे यांनी तक्रार दिली होती. त्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता पोलिसांनी सार्थक कपाडीला अटक करण्याची तयारी केली आहे. अतिशय अर्वा च्चआणि आक्षेपार्ह भाषेत हे ट्वीट करण्यात आले होते. सार्थक कपाडी ट्विटर हॅण्डल स्वतः वापरतो की त्याच्या नावाने फेक ट्विटर हॅण्डल तयार करण्यात आलं आहे की हे अकाऊंटच फेक आहे, याचा सायबर पोलिसांकडून तपास सुरु आहे. कसा समोर आला प्रकार? सुरुवातीला भाजपला या ट्वीटबद्दल कल्पनाच नव्हती. सार्थक कपाडी याचं ट्विटर हॅण्डल फॉलो करणाऱ्या भाजपच्या महिला कार्यकर्त्या नेहे ट्वीट पाहिले. त्यानंतर त्यांनी आमदार कृष्ण खोपडे यांना संबंधित ट्वीट पाठवले. त्यानंतर हा संपूर्ण प्रकार समोर आला. या प्रकारामागे ठाकरे गट : कृष्णा खोपडे या संपूर्ण प्रकारामागे ठाकरे गट असल्याचा आरोप आमदार कृष्णा खोपडे (Krishna Khopde) यांनी एबीपी माझाशी बोलताना केला. "खालच्या स्तरावर, आक्षेपार्ह आणि बदनामीकारक मजकूर पोस्ट करण्याच आला आहे. हा व्यक्ती कोण आहे याची चौकशी केली असता तर सार्थक कपाडी हा मुंबईचा असल्याचं कळलं. त्याची उद्धव ठाकरेंसोबत उठबस असते आणि तो ठाकरे गटाचा कार्यकर्ता आहे. पोलिसांनी याची चौकशी करावी," असं आमदार कृष्णा खोपडे यांनी म्हटलं.

## होळीला गालबोट! नाशिकमध्ये भरवस्तीत 28 वर्षीय

आहे. एकीकडे धार्मिक नगरी म्हणून असलेली ओळख आता गुन्ह्यांच्या घटनांनी पुसू लागली आहे. सर्व त्रहोळीचा सण साजरा होत आहे. होळी जळत असताना दुसरीकडे शहरातील पंचवटी (Panchavati) परिसरात दिंडोरी नाक्यावर भरवस्तीत 28 वर्षीय तरुणाला संपवल्याचे उघडकीस आले आहे. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच संशयितांचा पाठलाग करण्यात आला. मात्र गर्दीचा फायदा घेत संशयित फरार झाले. मात्र पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवताच वाध्या काही तासांत संशयितांना अटक करण्यात आली आहे. नाशिक शहरातील दिंडोरी नाका भागात राहणाऱ्या किरण गुंजाळ (Kiran Gunjal) याची भाईगिरीतून सिनेस्टाईल पाठलाग करत धारधार शस्त्राने वार करून निर्घृ णखून केल्याची घटना सोमवारी सुमारास घडली. किरण गुंजाळ हा गेल्या काही दिवसांपासून नाशिक कृषी उत्पन्न बाजार (Nashik Bajar Samiti) समितीत भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करत होता. नवनाथ नगर परिसरात राहणारा किरण गुंजाळ सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास पेठरोड येथून दुचाकीवरून जात असतांना तीन ते चार संशयितांनी पाठलाग सुरू केला. त्यानंतर गुंजाळ याने त्याची दुचाकी पेठफाटा येथे सोडून दिंडोरी नाक्याकडे पळ काढला. मात्र संशयित मारेकऱ्यांनी त्याला दिंडोरी नाक्यावर गाठत त्याच्या छातीत आणि पोटावरही धारदार शस्त्राने वार केले. त्यामुळे रक्ताच्या थारोळयात पडलेल्या किरण गुंजाळ याच्या गळयावर संशयितांनी पुन्हा वार केला. घटनेची माहिती मिळताच पंचवटी पोलिस घटनास्थळी दाखल झाले, मात्र तोपर्यंत गुंजाळ मयत झाला होता. काही तासांत संशयितांना अटक दरम्यान खून झाल्यानंतर पंचवटी पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. अवघ्या दोन तासांत संशयितांना अटक करण्यात आली असून यात नितीन पांडुरंग साबळे, देवा उत्तम पाटील, दिपक रामान्ना ताब्यात घेतले आहे. किरण गुंजाळ आणि संशयितांमध्ये भाजी मार्केटमध्ये काम करीत असतांना किरकोळ वाद होत होते. सोमवारी सायंकाळी देखील किरकोळ वाद झाला . यात संशयितांनी किरण याच्यावर चाकूने गळयावर व पोटात वार करून खून करून पळ काढला. आठवड्यावर होते बहिणीचे लग्न मयत किरण गुंजाळ याच्या बहिणीचा येत्या सोमवारी विवाह असून तो सकाळपासून लग्न पत्रिका वाटप करत होता. सोमवारी सायंकाळी तो लग्न पत्रिका वाटप करण्यासाठी जात असतांनाच मारेकऱ्यानी त्याला गाठून त्याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला चढविला. यावेळी वादातून तीन ते चार मारेकऱ्यांनी परिसरात राहणारा किरण गुंजाळ स्वीट्स या दुकानासमोर हल्ला केला. यात किरण गुंजाळ याचा मृत्यू झाला.

## मुंबईतून दोन वर्षांच्या मुलाचे अपहरण,

उपनिरीक्षक दत्तात्रेय माळवेकर यांनी फोन करून माहिती दिली की, मलिकराम यादव नावाच्या व्यक्तीने त्यांची अपंग पत्नी सरस्वती यादव यांनी दोन वर्षांच्या मुलाचे अपहरण केले आहे.सर्व डब्यांची झडती घेतली : दोन्ही अपहरणकर्ते 20103 एलटीटी-ऐशबागपर्यंत मुकद्दसला रवाना झाले आहेत. दोघेही ऐशबाग स्टेशनवर उतरू शकतात, अशी माहिती मिळताच आरपीएफ चौकीचे प्रभारी आणि जीआरपी चौकीचे प्रभारी सुभाषचंद्र यादव त्यांच्या पथकासह सकाळी ५.४२ वाजता ऐशबाग स्थानकाच्या फलाट क्रमांक एकवर पोहोचले. ट्रेन येताच सर्व डब्यांची त्यांनी सुमारे सहा वाजता झडती घेतली. तपासणी दरम्यान एका महिलेला दिव्यांग कोचमध्ये मागच्या बाजूला मुलासोबत दिसली. व्हॉट्सअॅपवर मिळालेल्या फोटोशी जुळल्यानंतर याची खात्री झाली. त्यानंतर पोलीसांनी पुढचे पाऊल उचलले. अपहरणाचा गुन्हा मान्य केला : आरोपी मलिकराम यालाही अटक करण्यात आली. चौकशीत दोघांनीही अपहरणाचा गुन्हा मान्य केला. आरपीएफ आणि जीआरपीच्या पथकाने बालक आणि अपहरणकर्त्यांना बाजारखाला पोलिसांच्या ताब्यात दिले. महाराष्ट्र पोलिसांनाही याबाबत माहिती देण्यात आली. सकाळी साडेअकरा वाजता महाराष्ट्र पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रेय माळवेकर यांच्यासह त्यांचे पथक विमानाने लखनौला पोहोचले. त्यानंतर दुपारी साडेबाराच्या सुमारास अपहरणकर्ते व बालक त्यांच्या ताब्यात देण्यात आले. सध्या अपहरणाच्या घटना दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे.

## लिंग परिवर्तन केलेल्या तरुणीने राहत्या

तिच्या आत्महत्येची माहिती तिच्या कोलकाता येथे राहणाऱ्या कुटुंबियांना देण्यात आली आहे. ही घटना गोरेगाव येथील यशवंतनगर, रिद्धीसिद्धी हाईट्स अपार्टमेंटच्या चौदाव्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक बी/१४०२ मध्ये घडली आहे. गळफास लावून आत्महत्या : जोएना ही मूळची कोलकाताची रहिवाशी असून २०१८ साली ती कोलकाता येथून मुंबईत नोकरीनिमित्त आली होती. तेव्हापासून ती तिच्या एका मित्रासोबत गोरेगाव येथील एका फ्लॅटमध्ये राहत होती. सकाळी तिचा मित्र एका सलूनमध्ये हेअर कटींगसाठी गेला होता. दरम्यान, साडेदहा वाजता तो फ्लॅटमध्ये आला असता त्याला जोएनाने घरातच आत्महत्या केल्याचे आढळून आले. या घटनेनंतर त्याने तिला तात्काळ गोरेगाव येथील एमजी रोडवर असलेल्या कपाडिया हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तिथे तिला डॉक्टरांनी मृत घोषित केले. काही वर्षांपूर्वी लिंग परिवर्तनः घटनेची माहिती हॉस्पिटल प्रशासनाकडून गोरेगाव पोलीसांना देण्यात आली होती. या माहितीनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. तपासात मृत महिलेचे नाव जोएना असल्याचे उघडकीस आले. घटनास्थळी पोलिसांना एक सुसाईट नोट सापडली आहे. त्यात तिने काही वर्षांपूर्वी लिंग परिवर्तन केल्याचे नमूद केले होते. लिंग परिवर्तन करुन ती मुलगी झाली होती. मात्र, तिला कोणीही मुलगी म्हणून स्विकारत नव्हते. तिच्यासोबत मुलगी असल्याप्रमाणे वागत नव्हते. त्यामुळे ती मानसिक तणावात होती. त्यातूनच तिला प्रचंड नैराश्य आले होते. याच नैराश्यातून तिने आत्महत्या केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. याप्रकरणी तिच्या मित्रांचा पोलीसांनी जबाब नोंदवून घेतला. त्याने तिच्या आत्महत्येबाबत कोणावरही संशय व्यक्त केला नाही. त्यामुळे पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करुन तिच्या कुटुंबियांना या आत्महत्येची माहिती दिली आहे. जोएनाचा मृतदेहनंतर शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला होता.

## परदेशात नोकरी देण्याच्या आमिषाने महिलांची

ते त्यांना करावं लागत होतं. या महिलांना भारतात परत जायचे असल्यास त्यांना तीन लाख रुपयांची मागणी केली जायची. त्यासाठी त्यांचा पासपोर्ट स्वतःकडे ठेवून घेतला जात असे. अशा प्रकारे कित्येक महिलांची फसवणूक या एजंटने केली होती. काशिमीरा येथे राहणाऱ्या संगीता पाटील यांच्या संपर्का तया महिला आल्यानंतर पाटील यांनी या महिलांची सुटका करण्यासाठी अटोकाट प्रयत्न केले. ओमान देशातील छत्रपती मराठा साम्राज्य या संघटनेची त्यांनी मदत घेतली. ओमान देशात पाटील यांना तेथील एंजटने एका बंद रुममध्ये इतर महिलासोबत डांबून ठेवलं. त्यांनी घरातील भिंतीच्या ए.सी. काढून तेथून पाच ते सहा महिलांन बाहेर काढले. त्यानंतर छत्रपती मराठा साम्राज्य संघटनेच्या मदतीने भारतीय दूतावासासोबत संपर्क साधून या सर्व महिलांना भारतात परत आणलं. या सर्व महिला भारतात परतल्यानंतर भारतातील एंजटवर काशिमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्यानंतर काशिमीरा पोलिसांनी अशरफ मैदु कैवारी आणि नमीता सुनिल मालुसरे या दोघांना अटक केली आहे. या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेऊन काशिमीरा पोलिसांनी कसून तपास सुरु केला आहे. अटक करण्यात आलेल्या टोळीत आणखी कोणाचा सहभाग आहे का? याबरोबरच ओमानमध्ये आणखी किती महिला आहेत याची माहिती पोलिस घेत आहेत. ही घटना गंभीर असून याचा कसून तपास केला जाईल अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

## मुलांचे अपहरण करून विकणारी टोळी

करणाऱ्या टोळीचा परभणी पोलिसांनी पर्दा फाशकेला आहे. विशेष म्हणजे मुलांचे अपहरण केल्यावर ही टोळी त्यांचे इतर राज्यात विक्री करायचे. पोलिसांनी 11 जणांच्या आतंरराज्य टोळीला बेड्या ठोकल्या असून यात 4 महिला आणि 7 पुरुषांचा समावेश आहे. तर पोलिसांनी या टोळीकडून 13 महिन्यापूर्वी अपहरण करण्यात आलेल्या साडे चार वर्षा च्या मुलाला हस्तगत करून पालकांच्या स्वाधीन केले आहे. पोलिसांनी 11 जणांना बेड्या ठोकल्या परभणी पोलिसांकडून स्थापन करण्यात आलेल्या मानवी तस्करी विभागाकडे मागच्या काही दिवसात परभणीत अपहरण आणि हरवलेल्या मुलांचा तपास देण्यात आला होता. दरम्यान पालम तालुक्यातील फळा येथील 4 वर्षा च्या मुलाच्या अपहरण प्रकरणाचे तपास देखील याच पथकाकडून सुरु होते. दरम्यान याच तपासात पोलिसांना दोन संशयित आरोपी मिळून आले होते. त्यांची अधिक चौकशी केली असता, मुलांचे अपहरण करून त्यांना विकणारी टोळी सक्रिय असल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांनी कारवाई करत या टोळीतील 11 जणांना बेड्या ठोकल्या आहे. असं सुरु होतं रॅकेट पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या टोळीतील आरोपी मोठ्या शिताफीने आपल्या नातेवाईकांच्या मुलांना आमिष दाखवून त्यांचे अपहरण करायचे. तसेच अपहरण केल्यावर या मुलांना परभणी, मराठवाडा तसेच हैदराबाद, विजयवाडा इथे कार्यरत असलेल्या विविध लोकांना 80 हजार ते 5 लाखांपर्यंत विकायचे. विशेष म्हणजे ज्यांना मुलबाळ नाही अशाच लोकांना हे रॅकेट अपहरण केलेले मुलं विकायचे. तर पोलिसांकडून या 11 आरोपींना अटक करण्यात आली असून, पोलीस आणखी तपास करत आहे.

## नव्याने मान्यताप्राप्त यादीत समावेश

नव्याने मान्यताप्राप्त यादीत समावेश व्हावा, यासाठी संबंधित वृत्तपत्रांच्या मालकांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली होती. ही पूर्तता दिनांक २६ जुलै २०२२ रोजी केलेली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष येवून कागदपत्रांची पाहणी केलेली होती. मात्र तब्बल ६ महिने उलटून गेल्यानंतरही याबाबतचा कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही. या दिरंगाईमुळे या वृत्तपत्राच्या संबंधित मालकांना वृत्तपत्रे चालवणे मुश्किल होवू लागले आहे. त्यामुळे या सर्व मालकांनी 'जर्नलिस्ट असोसिशन'च्या नेतृत्वाखाली महासंचालक भोज यांची भेट घेतलेली आहे.

## बारावी गणिताचा पेपर फूटप्रकरणी आता

शिक्षक देखील आहे. त्याच परिसरातील काही इसम कार्यरत आहेत. नेमका कसा हा व्हाट्सअप ग्रुप तयार झाला आणि त्याचे कनेक्शन मुंबई पर्यंत देखील सापडल्याचे पोलीस सूत्रांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.. मोठे रॅकेट सक्रिय? अतिशय गोपनीय पद्धतीने हा सर्व पेपर फुटी प्रकार गृह विभागाकडून हाताळला जात असून संपूर्ण राज्य सरकारची शिक्षण विभाग खळबडून जागे झाले आहे. सुरुवातीला अतिशय हलक्यात घेणाऱ्या या पेपर फुटीला आता एसआयटीकडे वर्ग करण्यात येत असल्याने याला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे .निश्चित यामध्ये काहीतरी मोठे रॅकेट सक्रिय असू शकते का? हा शोध घेतला जाईल. अमरावती बोर्डचे सचिव यांनी काढले पत्रक: सिंदखेड राजा तालुक्यातील केंद्र क्रमांक 601 602 606 609 या परीक्षा केंद्रावरील केंद्र संचालक वर्णन तात्काळ बदल करण्याचे आदेश बजावण्यात आले आहेत. तसेच तालुक्यातील बारावीच्या केंद्र संचालक यांनी तीन मार्च रोजी सायंकाळी तात्काळ बैठक घेऊन तेजराव काळे सहसचिव विभागीय परीक्षा मंडळ अमरावती यांच्या उपस्थितीमध्ये त्यांनी केंद्र अध्यक्ष व रनर यांना सुद्धा सूचना दिल्या आहेत. केंद्र अध्यक्ष तसेच रनर यांची काळजी घेऊन परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पाडण्यासाठी योग्य ती खबरदारी. तसेच परीक्षा केंद्राच्या आवारा मध्ये बाहेरील व्यक्तीला प्रवेश दिला जाणार नाही. विद्यार्थ्यांना भयमुक्त कॉपी मुक्त परीक्षा सुरळीत पाडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत .यावेळी शिक्षणाधिकारी प्रकाश मुकुंद शिक्षण उपनिरीक्षक जगन मुंडे तालुका कृषी अधिकारी वसंतराव राठोड सिंदखेड राजा चे गटशिक्षण अधिकारी रंगनाथ गावडे देऊळगाव राजा गटशिक्षणाधिकारी दादाराव मुसदवाले तालुक्यातील केंद्र संचालक व रनर उपस्थित होते तर एकंदरीत गृह विभागापाठोपाठ आता शिक्षण विभागादेखील खडबडून जागे होऊन अत्यंत कठोर पावलं उचलत. सर्व त्या उपाययोजना करत कॉपीमुक्त सरकारच्या अभियानाला यापुढे कुठे सुरंग लागू नये. याची काळजी घेत आहे.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार ०७ ते १३ मार्च - २०२३



## संपादकीय...

# मुखपत्रांचा मुखभंग !

व्यावसायिक नीतिमत्तेस तिलांजली देऊन राजकारण्यांच्या कच्छपी लागले की माध्यमवीरांचे काय होते याचा सर्वोत्कृष्ट धडा अमेरिकेत 'फॉक्स न्यूज' विरोधातील खटल्यातून शिकता येईल. ही वृत्तवाहिनी रिपब्लिकन पक्षाची, आणि त्यातही माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची, आनंददूत. म्हणजे चीअरलीडर. ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळणे आणि त्यांचे गोडवे गात राहणे एवढीच काय ती पत्रकारिता ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या काळात या वाहिनीने केली. सत्ताधारी कोणीही असो. त्यास प्रश्न विचारत राहणे हे माध्यमांचे खरे घटनादत्त कर्तव्य. पण 'फॉक्स'ने त्यास तिलांजली दिली. इतकेच नव्हे तर त्याहीपुढे जात ही वाहिनी ट्रम्प यांची जणू तुतारीच बनली. ट्रम्प यांनी काहीही बोलायचा अवकाश, मग ते कितीही हास्यास्पद वा वादग्रस्त आणि असत्य विधान का असेना, 'फॉक्स' वाहिनी ते ब्रह्मवाक्य समजून ट्रम्प यांची पाठराखण करण्यात धन्यता मानत राहिली. खाल्ल्या मिठास जागणे म्हणून याकडे एकवेळ दुर्लक्ष करता आले असते. पण ते या प्रकरणात करता येत नाही. याचे कारण 'फॉक्स'ने माध्यमांच्या सर्व मर्यादांचे सातत्याने उल्लंघन केले. दोन वर्षांपूर्वीच्या अध्यक्षीय निवडणुकीत जे झाले ती या मर्यादाभंगाची हद्द म्हणायची. या निवडणुकीत ट्रम्प यांचा धक्कादायक पराभव झाला. धक्कादायक त्यास म्हणायचे कारण त्यांच्या विजयाची हमी सर्व चदेत होते. खुद्द ट्रम्प यांचा तर कोणताही मर्त्य मानव आपणास पराभूत करू शकणार नाही, असा समज होता. यानंतरही ते हरले. तेव्हा लगेचच त्यांनी या निवडणुकांत सरकारी गडबड झाल्याची आवई उठवली. सरकारी यंत्रणेच्या हातचलाखीने आपण हरलो असे त्यांचे म्हणणे. 'फॉक्स' वाहिनीने त्यांची री ओढली आणि निवडणुकांच्या प्रामाणिकपणाविषयी संशय व्यक्त करणाऱ्या बातम्या द्यायला सुरुवात केली. ते धादांत असत्य होते. पण तरीही 'फॉक्स' वाहिनी तसे करत गेली. त्यानंतर अखेर निवडणूक प्रक्रियेत गुंतलेल्या कंपनीने 'फॉक्स'वर जवळपास १५० कोटी डॉलर्सचा बदनामी खटला भरला. त्याची सुनावणी सुरू झाली असून त्यात माध्यमांची लक्तरे वेशीवर टांगली जात असल्याचे दिसते.

यात कहर केला तो 'फॉक्स' वाहिनीचे मालक रूपर्ट मर्डोक यांनी. हे मर्डोक आणि नीतिमत्ता यांचे तसे काहीच नाते नाही. या खटल्यात या वाहिनीचे मालक या नात्याने त्यांची जबानी नोंदवली गेली. तीत या सद्गृहस्थाने आपल्याच वाहिनीतील पत्रकारांचे पुरते वस्त्रहरण केले असून आपले पत्रकार, संपादक हे ट्रम्प यांच्यासाठी खोटे बोलले, इतक्या स्वच्छपणे मर्डोक ही कबुली देतात. म्हणजे निवडणुकांत काहीही गैरप्रकार झालेला नाही, हे 'फॉक्स'च्या पत्रकारांसही माहीत होते. पण तरी ते ट्रम्प यांची बाजू घेत राहिले आणि असत्य वृत्तप्रसार करत राहिले. हे इतकेच नाही. त्याआधी संबंधित खात्याने 'फॉक्स' वृत्तवाहिनीच्या पत्रकारांच्या मोबाइल फोन्सची झडती घेतली. त्यांच्या त्यांच्यात झालेल्या बातम्यांच्या देवाणघेवाणीच्या, साध्या संदेशांच्या सर्व नोंदी दूरसंचार कंपन्यांकडून मिळवल्या. त्यातून ही पत्रकार मंडळी अधिकच उघडी पडली. कारण त्या सर्वांच्या आपापसातील संदेश देवाणघेवाणीतून स्पष्ट होणारी बाब म्हणजे त्या कोणालाच निवडणूक निकालाच्या वैधतेबाबत काडीचीही शंका नव्हती. निवडणुकीचे निकाल खरेच आहेत आणि ट्रम्प यांचा खरोखरच पराभव झालेला आहे यावर या सर्व मंडळींचे एकमत होते. पण प्रत्यक्षात या वाहिनीचे वृत्तकथन याच्या बरोबर उलट होते. म्हणजे सत्याची जाणीव असूनही ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळण्यासाठी ही सर्व पत्रकार मंडळी जाहीरपणे खोटे बोलत राहिली. आता हे सर्व चव्हाट्यावर आले आहे. या खटल्यांचे निकाल लागण्यास आणखी काही काळ आहे. पण यातील मुख्य आरोपी 'फॉक्स' वाहिनीच्या मालकाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या खोटेपणाची कबुली दिल्याने हा निकाल काय असेल याचा अंदाज बांधणे अवघड नाही. जगातील सर्वात बलाढ्य असा माध्यम-सम्राट, त्याच्या 'साम्राज्या'चा पकडला गेलेला खोटेपणा आणि त्यावर या माध्यमसम्राटाची भूमिका हे सर्व पाहिल्यावर काही प्रश्न उपस्थित होतात.

यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा नुकसानभरपाईचा. मतदान प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग असलेली कंपनी या अपप्रचारासाठी 'फॉक्स'कडून यावर सणसणीत आर्थिक नुकसानभरपाई मागू इच्छिते. आता आपले कर्मचारी खोटे बोलले असे खुद्द या 'फॉक्स'च्या मालकानेच मान्य केलेले असल्याने ही रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांकडूनच वसूल केली जाणार की मालक या नात्याने मर्डोक भरणार? वाहिनीचे मालक या नात्याने मर्डोक यांनी तर खाका वर केलेल्या आहेत. बातम्या देण्याचे काम माझे नाही आणि ते ज्यांचे आहे त्यांना खोटे बोलण्याचा आदेश मी दिलेला नाही, असे मर्डोक म्हणू शकतात. मर्डोक यांनी आपल्या पत्रकारांस कागदोपत्री खोटे बोलण्याचा आदेश दिलेला असणे अशक्य. म्हणजे पत्रकार लटकले. हे आपले लटकणे टाळावयाचे असेल तर या पत्रकार मंडळींस आपल्या मालकाविरोधात बोंब ठोकावी लागेल. म्हणजे तरीही व्यावसायिक कारकीर्द धोक्यात. तेव्हा हे सारे या पत्रकारांनी का आणि कोणासाठी केले हा प्रश्न.

तो तूर्त जरी 'फॉक्स' वाहिनीच्या पत्रकारांसमोर असला तरी तो या व्यवसायातील सर्वांसमोरच उभा ठाकतो, हे नाकारता येणारे नाही. यानिमित्ताने आपल्याकडील 'राडिया टेप्स' प्रकरणाचे स्मरणही समयोचित ठरावे. अनेक पत्रकार, संपादक आदी त्या प्रकरणात नेमणुकांबाबत राजकीय नेत्यांच्या कानास कसे लागत होते याचा धडधडीत पुरावा यानिमित्ताने समोर आला. एखाद्यास मंत्रीपद दिले जावे वा दिले जाऊ नये यासाठी ही पत्रकार मंडळी सहज मर्यादाभंग करताना आढळली. कोणत्याच प्रकरणी आपल्याकडे पुढे काही होत नाही त्याप्रमाणे या प्रकरणातही नंतर सारे काही शांत शांत होऊन गेले. त्यातील काही पत्रकार, संपादक आदी पुरोगाम्यांच्या वर्तुळातले मान्यवर असल्याने त्यांनीही याबाबत सोयीस्कर मौन बाळगले. नंतर या मंडळींचे

# नैसर्गिक आपत्तीमधल्या लिंगभेदावर हरित वित्त चा उपाय?

'कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये महिलांवर अत्याचार वाढतात,' असं वाक्य जी-२० समूह देशातील महिलांच्या परिषदेमध्ये नोंदवलं जात होतं, तेव्हा १९९३ च्या मराठवाड्यातील किल्लारीच्या भूकंपानंतर चौथ्या - पाचव्या दिवशी उमरगा तालुक्यातील चौकात पुरुषांना खुणावणाऱ्या महिला पाहिल्याचं आठवलं. आपत्तीमध्ये अन्नाच्या शोधात महिलेला खूप खस्ता खाव्या लागतात. पण घटना घडत असताना महिलांच्या बाजूने विचार करण्याची यंत्रणांची मती खुंटल्यासारखी असते. महिलांच्या बाजूने संवेदना जिवंत रहाव्यात यासाठी पुरुषी मानसिकतेच्या निर्दालनासाठी बरेच कष्ट घ्यावे लागणार आहेत , हेच वारंवार जाणवत राहातं.

हवामान बदलामुळे येणाऱ्या आपत्तीमध्ये जगभरातील २१.५ दशलक्ष लाेकोंना विस्थापित व्हावं लागतं. कधी भूकंप येतो, तर कधी तत्सुनामी. दुष्काळ आणि गारपीट ही संकटे तर ठराविक कालावधीमध्ये येतातच असेही प्रदेश आहेत. "अशा आपत्तीमध्ये होणाऱ्या मृत्यूंमध्ये महिलांचं प्रमाण पुरुषांपेक्षा १४ टक्के अधिक असतं," असं जी- परिषदेतील महिला समितीमध्ये मांडलेल्या हवामान बदलाच्या विषयावरील कागदपत्रांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. जगभरातील ४३ टक्के महिला शेती आणि पूरक व्यवसायांत कार्यरत आहेत. त्यामुळे हवामान बदलामुळे अतिवृष्टी असो की दुष्काळ- बदलाचा थेट परिणाम महिलांवर होतो. कारण आपत्तीमुळे निर्माण होणाऱ्या गरिबीसोबत तिलाच अधिक झगडावं लागतं. डोक्यावर हंडा घेऊन जाणाऱ्या महिलांची दुष्काळातील छायाचित्रं सर्वांनाच आठवतील, पण अतिवृष्टीनंतर नित्य लागणाऱ्या वस्तू मिळविण्यासाठी करावी लागणारी धडपडही महिलाच्या नशिबी अधिक तीव्र असते. हवामान बदलाच्या प्रक्रियेत महिलांची भूमिकेतून नियोजन , आखणी करण्याची प्रक्रिया कधी हाती घेतली नव्हती. त्यावर नुकतेच जी-२० देशातील महिला प्रतिनिधींनी नुकतीच चर्चा केली.

ही चर्चा अशा काळातील आहे जेव्हा इराणमध्ये तरुणी हिजाब काढून, तो जाळून पेहराव स्वातंत्र्य मागत आहेत., जेव्हा महिला आणि लहान मुलांवर युद्धाचा अधिक परिणाम होतो हे सत्ताधारी राज्यकर्त्यांना सांगण्यासाठी मुलांचे पाळणे अर्धगोलकार मांडून युद्धखोर मानसिकतांविरोधात निषेध नोंदवत आहेत... अशा वेळी, महिलांच्या नेतृत्वाखाली विकास प्रक्रिया व्हायला हवी, अशी मांडणी भारताकडून जी-२० समूह देशातील परिषदेत केली जात आहे. ही बाब स्वागतार्हच.

हवामान बदल हे जगासमोरचं नवं आव्हान आहे. त्यामुळेच आता भविष्यातील अर्थविचार हा 'हरित वित्त' या शब्दाभोवती गुंफलेला असू शकतो. सततचा दुष्काळ, अतिवृष्टी, भूस्खलनानंतर पुन्हा पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा लागतो. तो पैसा उभा कसा करायचा आणि कोणी हे कोडं सुटावं म्हणूनही चर्चा करण्यात आल्या. 'खरं तर विकसित देशांनी या कामी अधिक पैसा द्यायला हवा' हे हवामान बदलाच्या कार्यबल गटाच्या प्रमुख मार्टिना रोगाटो यांचं मत. त्या मूळच्या इटलीच्या. या परिषदेमध्ये आपल्या देशाची शेर्पा म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली होती. विकसित देशांनी केलेलं प्रदूषण अधिक आहे, याकडे लक्ष वेधून त्या म्हणतात : 'त्यामुळे हवामान बदलाचे परिणाम आणि त्यावर उपाय करण्याच्या उपक्रमास त्यांनी अधिक पैसा द्यावाच. तो देताना 'आम्ही पैसे दिले आहेत आता आम्ही प्रदूषण करायला मोकळे' अशी भूमिकाही घेऊन चालणार नाही.'

हवामान बदलाच्या आपत्तीच्या घटना आधीच कळाव्यात म्हणून पूर्व सूचना देणारी अत्याधुनिक यंत्रणा हे यातील महत्त्वाचं पाऊल. अनेक देशांमध्ये या यंत्रणा बसवताना अगदी शालेय पातळीवरील अभ्यासक्रमापासून ते तरुणांमध्ये कार्बन उत्सर्जनामुळे होणाऱ्या परिणामी जाणीव निर्माण करून देणं ही आजच्या काळाची गरज आहे. याच गटात काम करणाऱ्या दक्षिण कोरियाच्या अँजेला जू- ह्युन कांग यांच्या मतेही, या क्षेत्रात लागणारा पैसा उभा करणं हे सार्वत्रिक आव्हान असणार आहे. दक्षिण कोरियात यासाठी स्वतंत्र बँकच निर्माण करण्यात आली आहे. हरित विकासासाठी लागणारा पैसा खासगी कंपन्यांच्या गुंतवणुकीतून उभा करण्याचा प्रयोग दक्षिण कोरियामध्ये केला जात आहे. अशा प्रकारचे प्रयोग वेगवेगळया देशात व्हायला हवेत, असं त्या सांगतात.

'कार्बन क्रेडिट' कोणाला?

भारतातही अनेक जणी आता हवामान बदलावर काम करतात. पुणे येथील प्राची शेगावकर यांनी कोणत्या वस्तू व कार्यपद्धती वापरल्यावर आपण कार्बन उत्सर्जन कमी करतो याचं मोजमाप करणारे ॲप विकसित केलं आहे. कार्बन क्रेडिटच्या आधारे सवलती घेणाऱ्या कंपन्यांबरोबर लोकसहभाग वाढवणाऱ्या अनेक कल्पना आता पुढे येऊ लागल्या आहेत. राज्यात हवामान बदलाच्या अंगानंही सुरू असणाऱ्या चर्चांमध्ये अनेक सकारात्मक सूचना दिल्या जात होत्या. अगदी ग्रामीण भागातूनही अशा सूचना येतातच. देशभरात 'सामाजिक वनीकरणा'च्या नावे होणारी सरकारी वृक्ष लागवड करण्याऐवजी शेतकऱ्यांना झाडे लावायला सांगावीत आणि जसे झाड वाढेल तसे त्याला कार्बन क्रेडिट म्हणून रोख रक्कम दिली जावी, अशी मागणी काही वर्षापूर्वी मराठवाड्यातील पाणलोट-विकास क्षेत्रात काम करणारे विजयअण्णा बोराडे हे विविध व्यासपीठांवरून मांडत होते. त्यांच्या मते झाड लावण्यापेक्षा ते जगविणे हे अवघड काम. ते काम शेतकरीच करू शकतील. जर कार्पाेरेट कंपन्यांना कार्बन क्रेडिट मिळत असेत तर ते झाडे वाढवणाऱ्यांनाही मिळायला हवे. त्याची रक्कम सरकारने ठरवली तर पर्यावरणही वाचेल आणि नाहक होणारा सरकारी वृक्षलागवडीवरील पैशांची नासाडीही.

पुणे येथील प्राची शेगावकर यांनी केलेले ॲप असो किंवा बोराडे यांची सूचना हवामान बदलाच्या क्षेत्रात काम करायचे असेल तर मात करू शकणाऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग वाढवत त्याचे ज्ञान महिलांपर्यंत पोहोचवणं हे खरं आव्हान आहे. हवामान बदलामुळे होणारी स्थलांतरं, त्यात होणारी महिलांची परवड हे जागतिक पातळीवरचे प्रश्न आहेत. त्यांच्या सोडवणुकीसाठी प्रत्येक देशात आता 'हरित वित्त' ही संकल्पना वेगवेगळया सरकारांना स्वीकारावी लागणार आहे. जी- २० समूह देशाच्या परिषदेमध्ये भारताचे शेर्पा अमिताभ कांत यांनीही 'हरित वित्त' ही विकास प्रक्रियेला सुरळीत करणारी महत्त्वाची गरज असल्याचे सांगितले. महिला नेतृत्वाखाली विकास ही भूमिका मांडत उद्योग, महिलांचे अर्थविश्व आणि अधिकार, त्याला आवश्यक असणारी कायद्याची चौकट, डिजिटल युगातील विभाजन अशा अनेक विषयांवरील चर्चांमुळे काही नवी कवाडे उघडण्यासाठी आणखी खूप धडका माराव्या लागतील. विविध देशातील सत्ताधाऱ्यांना पर्यावरणातील बदलांमुळे खूप पैसा खर्च करावा लागत असल्याने यावर भविष्यात चर्चा होतील. त्यात महिलांना किती स्थान मिळेल यावर शंका असल्या तरी या क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या जी-२० समूह देशात वाढते आहे, ही जाणीवही ऊर्जा देणारी आहे. त्याचं स्वागत करायलाच हवं.

राजकीय बाजूही आहेच...

पण हे करताना आयोजनातील हेतू फक्त महिलांच्या सामाजिक, आर्थिक उत्थानाचा हाेता असे मानणे भाबडेपणाचं ठरेल. त्याचं भारतातलं कारण २०१४ नंतर लोकसभा निवडणुकीच्या मतदानामध्ये महिलांचे वाढलेल्या मतदानाच्या टक्केवारीतही दडलेलं आहे. १९६२ मध्ये भारतातील एकूण महिलांपैकी केवळ ४७ टक्के मतदार लोकसभा निवडणुकीमध्ये आपले मत नोंदवत होत्या, तर २०१४ मध्ये हेच प्रमाण ६२ टक्क्यांवर गेलं होतं. ही १९ टक्क्यांची वाढ, त्यात नव्यानं पडत जाणारी भर याकडेही डोळसपणे पाहावं लागेल. जी-२० समूह देशातील महिला प्रतिनिधीची चर्चा एका बाजूला त्याच वेळी विविध योजनांमधील महिला लाभार्थीचा शोध आणि त्यांच्याबरोबर ' सेल्फी' घेण्याचा केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्री स्मृती इराणी यांचा कार्यक्रम हे बंध ठिपक्याच्या रांगोळीसारखे जोडून पाहिले की परिषदेतील राजकीय बाजू समोर येतात. परिषदेच्या निमित्तानं रोषणाई एवढी होती की जणू दिवाळीच. अनेक शहरांमध्ये सुरू असणाऱ्या या 'जी -२०' बैठकांचं सकारात्मक वातावरण आणि मोठ्या शहरामधील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हसरी प्रतिमा याचे राजकीय अर्थ मात्र सर्वसामान्य माणसांपर्यंत पद्धतशीरपणे पोहोचले आहेत. प्रचारतंत्राचं हे नवे झगमगाटी रुप मध्यमवर्गीय मतदारांना ' लोभस' वाटणारं आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई, छ. संभाजीनगरमध्ये 400 लिटर दारुचं रसायन जप्त



राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या (State Excise Department) पथकाने शुक्रवारी (3 मार्च) रोजी मोठी कारवाई करत, हातभट्टी दारुचा कारखाना उद्ध्वस्त केला आहे. छत्रपती संभाजीनगर (Chhatrapati Sambhajinagar) जिल्ह्यातील पैठणच्या विहामांडवा परिसरात हा हातभट्टी दारुचा कारखाना सुरु होता. या कारवाईत एकाला अटक करत तब्बल 400 लिटर रसायनासह सहा लाख 32 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. योगेश दारासिंग गवळी (वय 28 वर्षे, रा. विहामांडवा, ता. पैठण) असे आरोपीचे नाव असल्याची माहिती, उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक शहाजी शिंदे यांनी दिली आहे.

दरम्यान याबाबत उत्पादन शुल्क विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विहामांडवा येथील योगेश गवळीच्या घरात गावठी हातभट्टीसह बनावट देशी दारु तयार करण्यात येत असल्याची माहिती दुय्यम निरीक्षक शिवराज वाघमारे यांना माहिती मिळाली होती. त्यावरुन वाघमारे यांच्यासह सहायक दुय्यम निरीक्षक सुभाष गुंजाळे, जवान योगेश घुनावत, राहुल बनकर, अश्विनी बोदर व व्ही. जी. चव्हाण यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा मारला. यावेळी पथकाला गवळीच्या घरात 180 लिटरच्या 240 सीलबंद बाटल्या व तयार देशी दारुचे ब्लेंड, हातभट्टी दारु, दारु भरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या काचेच्या रिकाम्या बाटल्या, देशी दारु भिंगरी संत्राच्या बाटल्यावर लावण्यात येणारे जिवंत बुचे सापडले. त्याशिवाय हातभट्टी दारू तयार करण्यासाठी 400 लिटर रसायनासह इतर साहित्य मिळाले.

गवळीचा साथीदार बीडहून मद्यार्क पाठवत होता

या प्रकरणात गवळी याच्यासह त्याचा साथीदार नारायण घुमरे (रा. बीड) याच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. तर गवळी यास बेड्या ठोकल्या असून, घुमरे फरार झाला आहे. तसेच गावठी दारु तयार करणाऱ्या आरोपी योगेश गवळीची परिसरात दहशत असल्याचे बोलले जात आले. तसेच, तो बनावट दारुची तस्करी करायचा. बनावट दारु तयार करण्यासाठी त्याचा साथीदार घुमरे हा बीडहून मद्यार्क पाठवत असल्याचे समोर आले आहे. तर आरोपीला न्यायालयात हजर केले असता, पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली. अधिक तपास दुय्यम निरीक्षक शिवराज वाघमारे करत आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाईचा धडका!

गेल्या काही दिवसांपासून औरंगाबाद विभागातील राज्य उत्पादन शुल्क विभागाकडू जोरदार कारवाईचा धडाका पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे अनधिकृत मद्यविक्री विरोधात शुल्क विभागाकडून मोठ्याप्रमाणावर कारवाई करण्यात येत आहे. ज्यात सर्वाधिक कारवाई धाबे आणि हॉटेलमध्ये परवाना नसताना दारु विक्री करणाऱ्यांच्या विरोधात करण्यात आल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी गांज्याविरोधात मोठी कारवाई छत्रपती संभाजीनगर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आली होती.

# पाचव्या पत्नीनेच केली पतीची हत्या, गुप्तांगही कापलं; झोपेच्या गोळ्या देऊन चिरला गळा




पाचव्या पत्नीनेच पतीला संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इतकंच नाही तर आरोपी महिलेने हत्या केल्यानंतर पतीचं गुप्तांगही कापलं. मध्य प्रदेशमधील ही धक्कादायक घटना समोर आली आहे. पतीच्या छळाला कंटाळून त्याच्या पाचव्या पत्नीनेच पतीची हत्या केली. कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत 21 फेब्रुवारी रोजी पोलिसांना रस्त्यावर एका तरुणाचा मृतदेह आढळला होता. मृतदेहाच्या मानेवर आणि गुप्तांगावर जखमा होत्या. यानंतर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करत तपास सुरु केला होता. 21 फेब्रुवारीला रस्त्यावर आढळला मृतदेह कोतवाली पोलीस स्टेशनचे अधिकारी अरुण पांडे यांनी सांगितले की, "उर्ती गावातील रहिवासी बिरेंद्र गुर्जरचा मृतदेह 21 फेब्रुवारी रोजी त्यांच्या घराजवळील रस्त्यावर सापडला होता. या घटनेची माहिती बिरेंद्रची पत्नी कांचन गुर्जरने पोलिसांना दिली. त्यानंतर अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर पोलिसांकडून या प्रकरणात तपास करण्यात आली. पोलिसांनी मृताच्या जवळच्या नातेवाईकांची चौकशी केली. कुऱ्हाडीने चिरला गळा, गुप्तांगही कापलं पोलीस अधिकारी अरुण कुमार पांडे यांनी माहिती देत सांगितलं की, "महिलेने पतीच्या जेवणात झोपेच्या 20 गोळ्या मिसळल्या. त्यामुळे जेवणानंतर पती गाढ झोपी गेला. यानंतर पत्नीने त्यांची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर तिने पतीच्या गळयावर कुऱ्हाडीने वार केले. इतकंच नाही तर त्यानंतर महिलेने पतीचं गुप्तांगही कापलं. यानंतर पतीचा मृतदेह घरापासून काही दूर अंतरावर फेकून दिला."चौकशीत हत्येचा उलगडा पोलिसांनी तपास केला असता, मृत बिरेंद्रची पत्नी कांचनही संशयाच्या भोवऱ्यात आली.

# 2022 मध्ये मुंबईत सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये 70 टक्क्यांची वाढ, गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांची माहिती

मुंबईत 2022 मध्ये सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत 70 टक्के वाढ झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत बोलताना दिली. तसेच, नोव्हेंबर 2022 पर्यंत फक्त एका वर्षाच्या कालावधीत मुंबईत सायबर (Mumbai Cyber Crime) फसवणुकीची किमान 4,286 प्रकरणं नोंदवण्यात आल्याची माहितीही यावेळी बोलताना फडणवीसांनी दिली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (3 मार्च) विधान परिषदेत बोलताना सांगितलं की, "2022 मध्ये मुंबईतील सायबर गुन्ह्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत 70 टक्के वाढ झाली आहे. नोव्हेंबर 2022 पर्यंतच्या एका वर्षाच्या कालावधीत मुंबईत सायबर फसवणुकीची किमान 4,286 प्रकरणं नोंदवण्यात आली आहेत." विधान परिषदेत आमदार भाई गिरकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadnavis) यांनी ही माहिती दिली. उपमुख्यमंत्री म्हणाले की, "नोव्हेंबर 2021 च्या तुलनेत नोव्हेंबर 2022 पर्यंत मुंबई पोलीस आयुक्तालयात सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये 70 टक्क्यांनी वाढ झाली आहे. सायबर गुन्ह्यांवर कारवाई करण्यासाठी मुंबईत पाच विशेष पोलीस ठाणे आहेत. नोव्हेंबर 2022 पर्यंत शहरात क्रेडिट कार्ड (Credit Card) आणि ऑनलाईन फसवणुकीच्या (Online Fraud) 1,294 प्रकरणांची नोंद झाली असून त्यापैकी 37 प्रकरणं सोडवण्यात आली आहेत." गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत बोलताना सांगितलं की, "या कालावधीत ऑनलाईन खरेदी, क्रिप्टो चलन गुंतवणूक, शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश, विमा, गुंतवणूक आणि नोकऱ्यांतील फसवणुकीची 2,216 प्रकरणं नोंदवली गेली आणि त्यापैकी 132 प्रकरणांचा छडा लावण्यात यश आलं आहे.

# दुचाकीवरून तब्बल सहा जणांचा प्रवास; अपघात होताच चार जागीच ठार



लातूर जिल्ह्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एकाच दुचाकीवरून चक्क सहा जण प्रवास करत असताना त्यांना भरधाव पिकअप टेम्पाने धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या सहा पैकी चार जण जागीच ठार झाले आहे. तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात शुक्रवारी 11 वाजण्याच्या सुमारास घडला आहे. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. विशेष म्हणजे अपघातापूर्वी दुचाकीवरून या सहा जणांचा प्रवास करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

मृतांमध्ये विलास प्रकाश आडे (वय 40 वर्षे), आकश प्रकाश आडे (वय 35 वर्षे), शंकर विकास आडे (वय 4 वर्षे), वैशाली विकास आडे (वय 6) यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लातूरच्या रेणापूर तालुक्यातील नाईकनगर, जवळगा तांडा येथील विलास प्रकाश आडे (वय 40 वर्षे), आकश प्रकाश आडे (वय 35 वर्षे), शंकर विकास आडे (वय 4 वर्षे), वैशाली विकास आडे (वय 6 वर्षे), शशिकला प्रकाश आडे (वय 55 वर्षे) आणि जान्वी विकास आडे (वय 12 वर्षे) असे सहा जण एकाच दुचाकीवरून (एमएच.24 वाय 4399) प्रवास करत होते. हे

दुचाकीस्वार लातूर येथून कळंबच्या दिशेने प्रवास करत होते. दरम्यान रात्री 11 वाजेच्या सुमारास हे दुचाकीस्वार जोडजवळा गावाजवळ आले.

याचवेळी कळंब येथून लातूरच्या दिशेने निघालेल्या भरधाव टेम्पोने (एमएच 25 एजे 5053) या दुचाकीला जोराची धडक दिली.

# मुलींच्या हॉस्टेलमध्ये मध्यरात्री दार वाजवून घाबरवण्याचा प्रकार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न वसतिगृहातील घटना



नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाशी (मेडिकल) GMC संलग्न असलेल्या बीएससी नर्सिंग करणाऱ्या मुलींच्या वसतिगृह (Hostel) परिसरात एक अज्ञात युवक मध्यरात्री दोन ते तीन वाजताच्या सुमारास फिरतो आणि हॉस्टेल रुमचे दार वाजवून मुलींना घाबरवत असल्याच्या धक्कदायक प्रकार पुढे आला आहे. काही मुलींनी धाडस करुन या प्रकाराचे चित्रीकरण केले. त्यात हा तरुण 25 ते 30 वर्षे वयोगटातील असल्याचे दिसून येते. विद्यार्थिनींनी वसतिगृह प्रशासनाकडे याची तक्रार दिली अजून मुलींच्या मनात भीतीचे वातावरण पाहायला मिळत आहे. या तरुणाचा शोध सुरु असून त्याच्या अटकेनंतरच उद्देश स्पष्ट होईल. तरुण मध्यरात्री मुलींच्या हॉस्टेलमध्ये, मुलींच्या खोलीचे दारही ठोकले तो मध्यरात्री मुलींच्या वसतिगृहात फिरतो... मुलींनी हटकले तर चुकून आल्याने सांगतो... हा अज्ञात नेमका कोण आहे? मध्यरात्री असा फिरण्याचा त्याचा नेमका काय उद्देश आहे याचा आता शोध घेतला जात आहे. नागपूरच्या (N a g p u r) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाशी संलग्न असलेल्या बीएसी नर्सिंग करणाऱ्या मुलींच्या वसतिगृह परिसरातील ही घटना आहे. 2 फेब्रुवारी रोजी अज्ञात युवक मध्यरात्री दोन ते तीन वाजताच्या फिरत होता, हॉस्टेलमध्ये शिरुन त्याने काही मुलींच्या खोलीचे दार ठोकले. त्यामुळे घाबरलेल्या मुलींनी एकमेकींना उठवलं. एकत्र गोळा झाल्यानंतर काही मुलींनी धाडस करुन त्याचे चित्रीकरण केले. त्यात तो 25 ते 30 वर्षे वयोगटाला तरुण असल्याचे पुढे आले. इतर वसतिगृहातही असाच प्रकार समोर या घटनेनंतर मुलींनी या प्रकाराची लेखी तक्रार कॉलेजच्या प्राचार्यांकडे केली. मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इतर वसतिगृहात असाच प्रकार पुढे आल्याने प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेत महाविद्यालयाच्या सुरक्षेत असलेल्या जवानांची गस्त वाढवली. सोबतच याची माहिती पोलिसांना देण्यात आली. याशिवाय त्या दिवशी वसतिगृहाच्या दारावर असलेल्या सुरक्षा रक्षकावर देखील कारवाई करण्यात आली आहे. रात्री अपरात्री फिरणारा तरुण कोण? मात्र या संपूर्ण प्रकारानंतर मुलींच्या मनात भीती निर्मा ण झाली. त्यामुळे वसतिगृहात रात्री अपरात्री फिरणारा हा तरुण कोण आहे? त्याचा नेमका उद्देश काय आहे याचा शोध हा आरोपी पोलिसांच्या हातात लागल्यानंतरच कळेल.

# धक्कादायक! अल्पवयीन मुलीने युट्यूबवर व्हिडीओ पाहून स्वत:चीच केली प्रसूती; बाळाचा मृत्यू




गर्भ वती असल्याची माहिती लपवून ठेवणाऱ्या अल्पवयीन मुलीने यू-ट्यब्र पाहून स्वत:च प्रसूती करून बाळाला जन्म दिल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी नागपूरच्या अंबाझरी पोलिस स्टेशनच्या हद्दीत उघडकीस आली आहे. हा प्रकार जेव्हा अल्पवयीन मुलीच्या आईला कळला तेव्हा त्या मुलीला लगेच रुग्णालयात भरती करण्यात आले. सध्या मुलीची प्रकृती चिंताजनक असून तिच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, अशा प्रकारे युट्यब्रर प्रसूतीचा प्रयत्न करणे हे धोकादायक असून मुलींच्या जीवावर बेतू शकतं असं तज्ज्ञांचं मत आहे. नेमकं काय घडलं? सोशल मीडियावर ओळख झालेल्या मित्राने अत्याचार केल्यानंतर एक पंधरा वर्षा चीमुलगी गर्भ वतीराहिली. तिने ही माहिती घरच्यांपासून लपवून ठेवली. नंतर युट्यब्र पाहून त्या पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीने स्वत:च प्रसूती करून बाळाला जन्म दिला. प्रसूती झाली तेव्हा ती घरी एकटी होती रात्री आई घरी आली तेव्हा तिला हा प्रकार कळताच मुलीला रुग्णालयात नेण्यात आले. दरम्यान, पोलिसांनी मुलीच्या आईचा मोबाईल तपासला असता तिने हे धाडस युट्यब्र बघून केलं असावं असा पोलिसांचा दावा आहे. मात्र, अल्पवयीन मुलीने अजून तरी याबद्दल पोलिसांना कोणतीही माहिती दिली नसल्याचं पोलिसांनी स्पष्ट सांगितलं आहे. दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इन्स्टाग्रामवरून संबंधित मुलगी आरोपीच्या संपर्का त आली. त्यानंतर एक दोन महिन्याच्या चॅटिंगनंतर आरोपी मुलाने मुलीला एका परिसरात बोलावून तिच्याशी शरीरसंबंध ठेवले. यातूनच ती मुलगी गर्भ वती झाली. मात्र, मुलीने जन्म दिलेल्या बाळाचा मृत्यू झाला आहे. मात्र, बाळाचा मृतदेह संशयास्पद ठिकाणी आढळला असल्याने घटनेला नवं वळण आलं आहे. तज्ज्ञांचं मत काय? अशा प्रकारे युट्यब्रवर प्रसूतीचा प्रयत्न करणे हे धोकादायक असून मुलींच्या जीवावर बेतू शकतं असं तज्ञांचं मत आहे. कारण प्रसूती काळात काही लिटर ब्लड हे मातेच्या शरीरातून बाहेर जातं. तसेच, बाळाची नाळही आईच्या गर्भा शी जुळलेली असते त्यामुळे हा खूप गंभीर प्रकार असून मुलीने एकटीने हे सर्व केलं असावं यावर डॉक्टरांचा विश्वास नाही. तसेच, आपल्याकडे कायदे आहेत पण त्याची नीट अंमलबजावणी होत नसल्याने हे प्रकार घडत असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. प्रसूती आणि गर्भ पात करणे हे दोन्ही धक्कादायक प्रकार मुलींनी करू नये असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

# डोंबिवलीत मॅनेजरवर सुपारी देऊन हल्ला, दोन हल्लेखोरासह ठेकेदार गजाआड






ठाण : डोंबिवलीतील (Dombivli Crime News) एका कंपनीमध्ये फर्निचरचा ठेका बंद करुन तो दुसऱ्या ठेकेदाराला दिल्याच्या वादातून पहिल्या ठेकेदाराने कंपनी मॅनेजरवर प्राणघातक हल्ला करण्यासाठी दोन सराईत गुंडाना सुपारी देऊन हल्ला केला होता. हा हल्ला सीसीटीव्हीत कैद झाल्याने त्यावरूनच गुंडांची ओळख पटवून कल्याण गुन्हे शाखेच्या पथकेने सुपारीबाज दोन गुंडांसह ठेकरदार असे चार जणांना अटक करण्यात यश आले आहे. पंकज प्रल्हाद पाटील (31, ठेकेदार रा. सोनारपाडा), शैलेश रावसाहेब राठोड (30, रा. देशमुख होम्स, टाटा नाका, डोंबिवली), सुशांत लक्ष्मण जगताप (27, रा. दिलीप सदन, कोळसेवाडी,) महेश शामराव कांबळे (31, सोनारपाडा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली एमआयडीसीतील बीईडब्ल्यू कंपनीमध्ये तक्रारदार सुरेंद्र मौर्या (वय, 41) हे मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. त्यातच गेल्या महिन्यात 15 फेब्रुवारी रोजी संध्याकाळच्या सुमारास कंपनीमधून काम आटपून आपल्या दुचाकीने घरी जात होते. त्याच सुमाराला एमआयडीसीतील म्हात्रेनगर येथे आल्यावर मॅनेजर मौर्या यांचा पाठलाग करून दुचाकीवरुन दोन अज्ञात व्यक्तीने त्यांची अचानक दुचाकी थांबवून त्यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला केला. या हल्ल्यात मॅनेजर गंभीररित्या जखमी झाल्याचे पाहून हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पळ काढला होता. मात्र हल्ल्याचे चित्रीकरण त्या परिसरात असलेल्या सीसीटीव्हीत कैद झाले होते.

हल्ल्यानंतर उपचारादरम्यान मॅनेजर मौर्या यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. त्या तक्रारीत मौर्या यांच्या कंपनीत आरोपी ठेकेदार पंकज पाटील याचे फर्निचर पुरवठ्याचे काम होते. हे काम काढून मौर्या यांनी दुसऱ्या ठेकेदाराला दिले होते. त्याचा राग पंकज यांच्या मनात होता. हा राग मनात ठेऊन पंकज, आणि शैलेश राठोड यांनी मॅनेजर मौर्या यांच्यावर हल्ल्याचा कट रचला होता. त्यानुसार गुंड सुशांत जाधव, आणि महेश कांबळे या दोन हल्लेखोरांना मौर्या यांच्यावर हल्ला करण्याची सुपारी दिल्याचे पोलीस तपासात समोर आले.

# माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या भावाची स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या



माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या चुलत भावाने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या (Suicide) केल्याची धक्कादायक घटना लातूरमध्ये समोर आल्याने खळबळ उडाली आहे. चंद्रशेखर पाटील चाकूरकर (वय 81 वर्षे) (C h a n d r a s e k h a r  P a t i l  C h a k u r k a r) असे आत्महत्या करणाऱ्या चाकूरकरांच्या भावाचे नाव आहे. चंद्रशेखर चाकूरकर हे लातूर शहरातील आदर्श कॉलनी भागात राहत होते. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, पोलिसांकडून पंचनामा करण्यात येत आहे. तर चंद्रशेखर चाकूरकर यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी परिचित असलेल्या अनेकांना 'गूड बाय' असा टेक्स मॅसेज केला होता. चंद्रशेखर चाकूरकर हे शिवराज पाटील चाकूरकर यांचे चुलत भाऊ आहेत. दररोज सकाळी ते फिरायला घराबाहेर पडायचे. त्यानंतर ते स्वताच्या घरी जाण्याऐवजी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या घरी जत होते. तिथे चहा पाणी झाल्यावर तेथील पेपर वाचत बसणे ही त्याची खूप वर्षा पासूनची सवय आहे. त्यानंतरच ते बाजूलाच असलेल्या स्वतःच्या घरी जात होते. तर शिवराज पाटील चाकूरकर यांच्या कुटुंबातील अधिकतर व्यक्ती हे लातूर येथील निवासस्थानी कधीतरीच हजर असतात. आज शिवराज पाटील चाकूरकर यांचे चिरंजीव शैलेश पाटील हे सकाळी घरातच होते. दरम्यान सकाळी फिरून आल्यावर नित्याप्रमाने चंद्रशेखर चाकूरकर हे शिवराज चाकूरकर यांच्या घरी आले. घरात आल्यावर शैलेश पाटील यांनी त्यांना चहा घ्या मी आवरून येतो, असे सांगून निघून गेले. मात्र काहीवेळाने गोळीचा आवाज झाला. त्यामुळे घरातील नोकर आणि शैलेश पाटील हे धावत हॉलमध्ये आले. यावेळी त्यांना तिथे चंद्रशेखर पाटील चाकूरकर हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसून आले. तर घटनेची माहिती तात्काळ लातूर पोलिसांना देण्यात आली आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामाची प्रक्रिया सुरू केली आहे. अनेकांना केला 'गूड बाय'चा मॅसेज दरम्यान चंद्रशेखर चाकूरकर यांनी आधीच आत्महत्या करण्याचा निश्चीय केला असल्याचं समोर आले आहे. कारण आज सकाळी जेव्हा ते नेहमीप्रमाणे घरातून बाहेर पडले, त्यानतंर त्यांनी स्वताच्या मोबाईल मधील परिचित असलेल्या अनेकांना 'गूड बाय' असा टेक्स मॅसेज केला होता. तर काही वेळाने व्हॉट्सअँपवर देखील त्यांनी 'गूड बाय' स्टेटस ठेवला होता. त्यानंतर त्यांनी स्वतःच्या परवानाधारक पिस्तुलातून गोळी झाडून आत्महत्या केली आहे.

# बारावी पेपर फुटी प्रकरण, व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप बनवून कॉपी; दोन शिक्षकांसह पाच जणांना अटक




बारावी पेपर फुटी प्रकरणात नवनवीन माहिती समोर येत आहे. बुलढाण्यात पेपर फुटीसाठी व्हॉट्सअ‍ॅपचा वापर केल्याचं समोर आलं आहे. व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप बनवून कॉपी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणा प्रकरणात दोन शिक्षकांसह पाच जणांना अटक करण्यात आली आहे. याशिवाय परीक्षेत पास करून देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी 10 ते 12 हजार रुपये घेतले जात असल्याची, माहितीही सूत्रांकडून समोर येत आहे.बारावी पेपर फुटी प्रकरण, व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप बनवून कॉपी बारावी पेपर फुटी प्रकरणी तपास सुरु असून आहे. व्हॉट्स अ‍ॅप ग्रुप बनवून कॉपी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. 99 जणांचा व्हॉट्सॅप ग्रुप बनवून त्यामध्ये पेपर लीक केल्याचं उघडकीस आलं आहे. या ग्रुपमध्ये शिक्षक , काही विद्यार्थी , विद्यार्थ्यांचे पालक व विविध क्षेत्रातील काही व्यक्ती असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र पेपर फुटीची घटना समोर आल्यावर हा संबंधित व्हॉट्सॅप ग्रुप डिलीट करण्यात आला. याबाबत पोलिसांच्या सायबर सेलकडून अधिक तपास सुरु आहे. सायबर सेलकडून डिलीट करण्यात आलेल्या डेटा लवकरात लवकर रिकव्हर करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे. बारावीच्या गणिताच्या पेपरफुटीची मुंबई कनेक्शन बारावीच्या गणिताच्या पेपरफुटी प्रकरणाचा संबंध मुंबईतील विद्यार्थ्यांशीही असल्याचं समोर आलं आहे. मुंबईतील विद्यार्थ्याच्या मोबाईलमध्ये गणित पेपरचा काही भाग आढळला आहे.

# नाशिकमध्ये गुन्हेगारीवर 'अंकुश' लावण्यासाठी 'कोम्बिंग ऑपरेशन', 58 टवाळखोरांवर कारवाई



नाशिक (Nashik) शहरात गेल्या काही दिवसांत खून तसेच गुन्हेगारीच्या (Crime) घटनांचे सत्र सुरू आहे. या वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस आयुक्तांनी अधिकाऱ्यांना कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. या अनुषंगाने शहरात शुक्रवारी मध्यरात्री अचानक कोम्बिंग ऑपरेशन (Combing Operation) राबविण्यात आले. त्यावेळी घरात आढळून आलेल्या 11 संशयितांना ताब्यात घेत त्यांच्यावर कारवाई केली. गेल्या काही दिवसांपासून शहरात रोजच कुठे खून (Murder) तर कुठे प्राणघातक हल्ला, तर कुठे विनयभंगाच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे सराईत गुन्हेगारांसह इतर गुन्हेगारांमध्ये वाढ होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास येत आहे. वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी, गुन्हेगारांमध्ये 'खाकी'चा जरब निर्मा ण व्हावा, याउद्देशाने पोलीस आयुक्त अंकुश शिंदे (N a s h i k  C P) यांनी कोम्बिंग ऑपरेशन राबविण्याचे आदेश सर्व पोलीस ठाण्यांना दिले होते. या मोहिमेत एकूण 128 सराईत गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. तसेच हद्दपार करण्यात आलेल्या 51 संशयितांच्या घरी धडक दिली. त्यावेळी घरात आढळून आलेल्या 11 संशयितांना ताब्यात घेत त्यांच्यावर कारवाई केली. नाशिक शहरातील मागील काही दिवसांपासून वाहन चोरी, घरफोडी, मोबाइल स्नॅचिंग, चेन स्नॅचिंगसह हाणामाऱ्या, शस्त्राचा धाक दाखवून जबरी लुटीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी बैठक घेत कोम्बिंग ऑपरेशन राबविण्याचे ठरविले. त्यानुसार शुक्रवारी रात्री 11 ते मध्यरात्री तीन शहर आयुक्तालयाच्या हद्दीत एकाचवेळी पोलिसांचा फौजफाटा वाहनांसह रस्त्यावर उतरला. संशयित गुन्हेगारांसह सराईत गुन्हेगारांची झाडाझडती पोलिसांनी सुरू केली.

या मोहिमेत अनेक संशयितांच्या घरात घुसून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत तीन पोलीस उपायुक्त, सर्व विभागांचे सहायक आयुक्त, 15 पोलीस निरीक्षक, 29 सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक, 236 पोलीस अंमलदारांनी सहभाग घेतला.

64 सराईत गुन्हेगारांना धडा

कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान पोलीस आयुक्तालय हद्दीत एकूण 128 रेकॉर्डवरील गुन्हेगार, हिस्ट्रीशिटर गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. यावेळी 64 संशयितांवर कारवाई करण्यात आली.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्क:-9594418181 / 8424989898